“ ज्ञानाची शेती ”

# कृषि निविष्ठा खरेदी व वापरत असताना घ्यावयाची काळजी

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

## ❖ बियाणे, रासायनिक खते, किडनाशके विकत घेताना काय काळजी घ्यावी ?

सद्याचे शेती पध्दतीमध्ये शेती व्यवसाय करत असताना शेतकऱ्यांना जवळपास 100% बाजारावर अवलंबून राहावे लागत आहे. म्हणजेच शेतकऱ्याला लागवड करत असलेल्या पिकासाठी, शेतीसाठी आणि स्वतः घरी वापरण्यास आवश्यक सर्वबाबीसाठी दररोजच काही ना काही विकत घ्यावे लागते. त्यामध्ये बियाणे, रोपे, रासायनिक खत, शेणखत, गांडूळ खत, लिंबोळीपेंड, किडनाशके ह्या निविष्ठा खरेदी कराव्या लागतात तर मजूर, ट्रक्टर, औजारासह, फवारणी यंत्रे जसे की ड्रोन, पिक काढणीसाठी हार्वेस्टर इ. च्या सेवा भाडे तत्त्वावर घ्याव्या लागतात. म्हणजेच आजची शेती ही सर्वस्वी बाजारातील निविष्ठा व सेवेवर अवलंबून आहे व त्यासाठी शेतकऱ्यास नगदी मोबदला द्यावा लागतो. जेंव्हा शेतकऱ्याला या सेवा, सुविधा व निविष्ठा खरेदी करत असताना तसेच वापरताना कोणती काळजी, दक्षता घ्यावी याबाबत आज आपण माहिती घेणार आहोत.



## ❖ निविष्ठा खरेदी नियोजन :

येणाऱ्या खरिप हंगामासाठी आपल्याकडील एकूण किती क्षेत्रावर पेरणी करावयाची आहे ? व त्यामध्ये कोणती पिके व वाण वापरावयाचे आहेत याबाबत एक आराखडा शेतकऱ्यानी तयार करावा. त्यासाठी आवश्यक बियाणे, रासायनिक खते, सेंद्रिय खते, तसेच बिजप्रक्रियासाठी आवश्यक जैविक खते, किडनाशके, तणनाशके एक यादी तयार करावी व त्याप्रमाणे आर्थिक तरतूद करून वेळेत खरेदी केल्यास ऐन हंगामामध्ये पाहिजे त्याच व आवश्यक तेवढ्या निविष्ठा खरेदी करता येतील आणी त्यांच्या दर्जामध्ये कोणतीही तडजोड करण्याची गरज पडणार नाही.

## ❖ बियाणे खरेदी करत असताना काय पाहावे :

निवडलेला वाण हा आपल्याकडील जमिन, हवामान व लागवड करावयाच्या हंगामासाठी कृषी विद्यापीठांनी, बियाणे उत्पादकाने शिफारस केलेला आहे का ? याची खात्री करावी.

- ✓ सदरचा वाण बागायती आहे कि ? कोरडवाहू ?
- ✓ निवडलेल्या वाणाचे उत्पादनाबाबत ईतर शेतकऱ्याचे आजपर्यंतचे अनुभव काय आहेत ?
- ✓ उत्पादक व विक्रेत्यांकडून सदर वाणाची संपूर्ण माहिती घेवून तो आपल्या परिसरासाठीची शिफारस तपासा.
- ✓ सुधारित जातीचे बियाणे दर 3 वर्षानी बदलावे, दरवर्षी नव्हे. उदा. भात, सोयाबीन, मूग, उडीद, ई.
- ✓ संकरित वाणाचे बियाणे दर वर्षी, दर हंगामासाठी बाजारातून विकत घ्यावे.
- ✓ रोपांची लागवड करावयाची असेल तर आपण निवड केलेल्या वाणांची रोप तयार करून घेण्यासाठी खात्रीचे व उत्तम दर्जाची रोपे पुरवठा करण्यासाठी विश्वासू, उच्च गुणवत्तेचे निकष पाळणाऱ्या रोपवाटिकेकडे रोपांची

आगाऊ नोंदणी करावी. रोपे तयार करत असताना 2 ते 3 वेळा रोपवाटिकेस भेट देऊन आपल्या रोपांची व्यवस्थित काळजी घेतली जात आहे का याची खात्री करावी.

- ✓ किती क्षेत्रावर लागवड करावयाची आहे? निवडलेल्या वाणाची लागवड किती अंतरावर करण्याची शिफारस बियाणे उत्पादकाने केलेली आहे ? त्यानुसार बियाणाचे पॅकिंग व एकूण बियाणाची आवश्यकता आहे तेवढेच बियाणे विकत घ्या. हंगामनिहाय लागवडीचे अंतर बदलत असते तसेच जमिनीच्या प्रकारानुसार ही लागवडीचे अंतर बदलते त्यामुळे बियाण्याची गरज कमी जास्त होऊ शकते.



- ✓ नोंदणीकृत (परवाना धारक) विक्रेत्याकडूनच बियाणे खरेदी करावे.
- ✓ विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करत असताना पक्की पावती घ्यावी. त्यामध्ये सर्व माहिती जसे की बियाणाचा प्रकार, वाण, उत्पादकाचे नाव, बॅच नंबर, उत्पादन दिनांक, वापरण्याचा अंतिम दिनांक, पॅकिंग दिनांक , एकूण रक्कम व विक्रेत्याची स्वाक्षरी हे तपासून पहा.
- ✓ बियाणाच्या पिशवी / बॅगवर दोन प्रकारचे लेबल (चिट्ठी) असतात.प्रमाणित व सत्यतादर्शक बियाणे यामध्ये काय फरक असतो याबाबत माहिती करून घ्या.
- ✓ शक्यतो प्रमाणित बियाणे (निळे लेबल) विकत घ्या. चिट्ठीवर (लेबलवर) बियाणाबाबतची वरिल सर्व माहितीसह बॅच क्रमांक, बियाणाची शुध्दता, उगवणक्षमता, वजन ई. ची खात्री करून बियाणे खरेदी करावे.

बियाणे खरेदी केल्यानंतर बियाणाची पिशवी फाडतांना त्यावर असलेले लेबल न फाडता पिशवी उलट्या म्हणजेच खालच्या बाजूने फोडावी. बियाणे पेरताना थोडेशे बियाणे त्याच पिशवीत, पिकाची काढणी होईपर्यंत बियाणे खरेदी पावतीसह जपून ठेवा.

बियाणे उगवणीचे संदर्भात काही अडचण आल्यास संबंधित बियाणे उत्पादक, विक्रेता व कृषी विभागाचे स्थानिक कार्यालयात रितसर लेखी अर्ज देऊन त्याची पोहोच घ्यावी व याबाबतचा पाठपुरावा करावा.

ज्ञानाची शेती फायदेशी व आरोग्यदायी..!

### ❖ रासायनिक खताची निवड कशी करावी ?

आपल्याकडील जमिनीतून मातीचा नमूना काढून तपासून घ्यावा व त्या अहवालामध्ये शिफारस केलेल्या रासायनिक खताचा शक्यतो वापर करावा.

- ✓ येणाऱ्या हंगामात जमिनीच्या प्रकारानुसार रासायनिक खताची निवड करावी.
- ✓ नत्रयुक्त खताचे काम कायिक वाढ करणे, स्फुरदयुक्त खताचे काम मुळ्याची वाढ करणे, फुल, फळ धारणा व पालाशचे काम फळास रंग,गोडी, दर्जा सुधारणे आणि पिकाची प्रतिकारक्षमता विकसित करणे हे आहे.
- ✓ चुनखडीचे प्रमाण कमी असलेल्या, जास्त सामू असलेल्या व भारी जमिनीसाठी 3 बॅग सिंगल सुपर फॉस्फेट ( पावडर ) चा वापर करा त्यामधून स्फुरद तर मिळेतेच पण त्यासोबत कॅल्शियम 18.21% व गंधक 11-12% आपल्या जमिनीस मिळतो.
- ✓ युरियाचा वापर 20 दिवसाच्या अंतराने थोड्या थोड्या प्रमाणात म्हणजेच विभागून करावा, ज्यामुळे त्याचा ऱ्हास होणार नाही व प्रदूषणात भर पडणार नाही. स्फुरद व पालाश पेरणीपूर्वी किंवा पेरणीच्या वेळेस देण्यात यावा.

- ✓ भात, भुईमूग, सोयाबिन, सूर्यफूल या सारख्या गळीतधान्य पिकासाठी युरिया ऐवजी अमोनियम सल्फेट मधून नत्र खत द्यावे जेणेकरून त्यामधिल नत्र पिकास हळूहळू उपलब्ध होईल व नत्रासोबत असणारे गंधक हे अन्नद्रव्य प्रथिने व तेलाचे प्रमाण वाढवण्यास मदत करेल.
- ✓ कडधान्य व गळीत धान्य पिकास संयुक्त खते जसे की 20:20:00:13 व 24:24:00:08 किंवा जिप्सम, सिंगल सुपर फॉस्फेट या खताचा वापर करावा.
- ✓ कडधान्य पिकासाठी नत्राची मात्रा कमी असलेली खते जसे की 12:32:16 चा वापर करावा.
- ✓ केवळ डीएपी ते पण " सम्राट " युरिया तो पण " सुफला " पाहिजे असा आग्रह धरू नका .
- ✓ संयुक्त खते मग ते कोणत्याही उत्पादकाची असली तरी त्यांचा दर्जा हा चांगलाच असतो. त्यामुळे अनावश्यक एकाच ब्रँडच्या मागे लागू नका व बाजारामधील गैरप्रकारास हातभार लावू नका.
- ✓ शक्यतो नत्र, स्फुरद, व पालाश एकत्रित असलेल्या संयुक्त खताचा वापर करावा.
- ✓ मिश्र खतांचे दर्जाबाबत खात्री करून ती वापरावीत किंवा त्यांचा वापर टाळलेलाच बरा.
- ✓ सुक्ष्ममूलद्रव्यांचे ग्रेड - I चे भरपूर प्रकार बाजारात उपलब्ध आहेत त्याचा वापर खरिप - रब्बी पिकासाठी वर्षातून एक वेळेस शेणखतासोबत मिसळून मातीमधून करावा त्यानंतर कमतरता भासल्यास पिकावर सूक्ष्मलद्रव्य ग्रेड - II ची फवारणी केली तर त्याची पूर्तता होत असते.



- ✓ कडधान्य / गळीत धान्य पिकास नत्रयुक्त खताचा वापर शिफारशी एवढाच करावा. पेरणीनंतर या पिकास नत्रयुक्त खताचा (युरिया) वापर करू नये.
- ✓ भारी जमिनीमध्ये पाण्याचा निचरा होत नसेल तर एमओपी खत वापरू नका त्याऐवजी एसओपी हे खत वापरावे .
- ✓ वर्षांनुवर्षे सोयाबीन व हरभरा या पिकासाठी डीएपी या संयुक्त खताचा वापर केल्यामुळे जमिनीतील पालाशची पातळी खालावलेली आहे त्यामुळे पिकास पालाश ची मात्रा द्यावी.
- ✓ पालाश हे अन्नद्रव्य पिकास जैविक - अजैविक ताणास तोंड देण्यास सक्षम करते, पिकाची प्रतिकारक्षमता सुधारते, पिक किड व रोगास बळी पडत नाही व उत्पादनाचा दर्जा व प्रत सुधारते आणी एकंदर उत्पादनात वाढ होते.
- ✓ क्लोराईड संवेदनशील पिके जसे की द्राक्ष, केळी या पिकास पालाश सल्फेट ऑफ पोटॅश यामधून द्यावे.
- ✓ पेरणी ही बीबीएफ ट्रॅक्टर चलित यंत्राद्वारेच करावी यामध्ये बियाणे व खत एकाचवेळी दिले जाते त्याचवेळेस दोन बेडमध्ये सरी सोडली जाते. पेरणी करत असताना रासायनिक खत बियाणाचे खाली पडत असल्याची खात्री करावी.

फायदेशीर व आरोग्यदायी..!

- ✓ शिफारशीतील अंतरावरच पेरणी करावी. अनावश्यक रोपांची गर्दी करू नये, ज्यामुळे रोपांची एकमेकांशी जागा, सूर्यप्रकाश, पाणी आणी अन्नद्रव्यासाठी अनावश्यक स्पर्धा होते, पिकाची उंची जास्त वाढते, कायिक वाढ जास्त होते आणि पर्यायाने उत्पादन कमी मिळते.
- ✓ खरिप, रब्बी किंवा 3-4 महिण्याचा पिकाचा कालावधी असलेल्या हंगामी पिकास रासायनिक खतांचा वापर हा पेरणीचे वेळीच (Basal Dose) करावा म्हणजे स्फुरद व पालाश पिकांचे गरजेप्रमाणे उपलब्ध होत असते.
- ✓ नत्रयुक्त खतांचा वापर खुरपणीनंतर म्हणजेच एक महिण्यांनी काही पिकामध्ये शिफारस केलेला आहे. उदा. मका, शिफारस केलेल्या पिकासाठीच नत्राचा दुसरा हप्ता द्यावा , उठ सूट युरिया फोकून देऊ नये.
- ✓ कोणतेही खत वापरताना खताचे 4 R लक्षात ठेवावेत. कोणते खत, कोणत्या वेळी, कोणत्या ठिकाणी व किती द्यायचे हे महत्वाचे आहे. कोणते खत किती देता यापेक्षा कधी , कसे , कुठे आणी केंव्हा देता हे जास्त महत्व आहे.
- ✓ सल्फेट व फॉस्फेट युक्त खते एकमेकात मिसळून देऊ नयेत.
- ✓ पाण्यात विरघळणारी खते शक्यतो फवारणीसाठी वापरावे. उच्च बाजार मूल्य असलेल्या पिकास शक्यतो ही खते वापरावीत परंतु तिही विचारपूर्वक आणि अल्प प्रमाणात.
- ✓ कोणतेही खत, कोणत्याही पिकास, कोणत्याही अवस्थेमध्ये द्यावयाचे असेल तर ते माती आड होणार असेल तरच द्या अन्यथा खताचा वापर करू नका, फोकून उघड्यावर पडत असेल तर खत देऊ नका.
- ✓ पिकास जमिनीतून दिलेले खत हे ज्या स्वरूपात आहे त्या स्वरूपात पिकास घेता / उचलता येत नाही त्यावर प्रक्रिया करून पिक मुळीद्वारे अन्नद्रव्य शोषण करत असतात आणि हे काम सूक्ष्मजीव करत असतात. दिलेली खते लागू होण्यासाठी जमिनीत सूक्ष्मजीवांची संख्या व कार्यक्षमता वाढवण्यासाठी जास्तीत जास्त सेंद्रिय पदार्थाचा वापर करावा.
- ✓ सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी बाजारातून वेगवेगळ्या प्रकारची जैविक खते जसे की मशरूमचे खत, ह्यूमिक ॲसिड / जेल, सिटी कंपोस्ट, जैविक भूसुधारके, दर्जाहीन अखाद्य पेंडी असे काहीही आणून जमिनीत टाकू नका त्यामुळे सेंद्रिय कर्ब वाढत नाही उलट जमिनीतील प्रदूषणामध्ये वाढ होते व उत्पादन खर्च वाढतो.
- ✓ माती खालील पिकाचा भाग जमिनीस, मधला भाग जनावरास व शेंड्याकडील भाग म्हणजेच धान्य, फळ, भाजी आपणास / मानवास याप्रमाणे पिकाची विभागणी करा.
- ✓ जमीन कायम झाकून ठेवा त्यासाठी सेंद्रिय आच्छादन उत्तम, सेंद्रिय पदार्थाचे आच्छादन करता आले नाही तर प्लास्टिक मल्चिंगचा वापर करावा.

### ❖ किडनाशकांची खरेदी :

येणाऱ्या हंगामासाठी आपण निवडलेल्या पिकांसाठी बिजप्रक्रिया, तणनाशके व किड व रोग व्यवस्थापनासाठी किडनाशकांची निवड व आवश्यक प्रमाण- गरज किती आहे याचा आराखडा तयार करावा.

- ✓ आपण निवडलेल्या पिकासाठी जैविक बिज प्रक्रिया कोणती आहे याबाबत माहिती घ्या, रायझोबियम, अझाटोबॅक्टर, ट्रायकोडर्मा, स्पुरद विरघळणारे जिवाणू ( PSB ) पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू ( KMB ) ची बिजप्रक्रिया करा.
- ✓ खरिपातील पिके असोत अथवा भाजीपाला लागवड असो कोणत्याही पिकास रासायनिक किटकनाशक, बुरशीनाशकांची जमिनीमधून आळवणी करू नका. यामुळे केवळ आपण जमिनीतील सूक्ष्मजीवांचा नाश करत नाही तर पाणी, हवा, माती प्रदूषित करून संपूर्ण परिसंस्था धोक्यात आणत आहोत हे कायम लक्षात ठेवा.

- ✓ कृषी विद्यापीठ व केंद्रिय किटकनाशक मंडळ तथा नोंदणी समितीने पिकनिहाय शिफारश किटकनाशके व बुरशीनाशकांची यादी माहीत करून घ्या .
- ✓ किड व रोगांचा प्रकोप किंवा प्रार्दूभाव वाढण्यासाठी कोणते हवामान अनुकूल असते याबाबत माहिती घ्यावी.
- ✓ किडींची ओळख, जास्त नुकसान करणारी किडीची अवस्था, नुकसानीचा प्रकार, आर्थिक नुकसाची पातळी याबाबत सखोल माहिती घ्या.
- ✓ रोगांसाठी अनुकूल हवामान, तापमान, आद्रता ची पातळी कशी असल्यावर प्रार्दूभाव वाढतो याची माहिती घ्यावी, पिकाची नियमित निरिक्षण करा.
- ✓ शक्यतो किटकनाशकाचा वापर सकाळी करावा व बुरशीनाशकांचा वापर सायंकाळी करावा.
- ✓ फवारणी करत असताना जमिनीत योग्य ओलावा, स्वच्छ व निरभ्र आकाश ,चांगला सूर्यप्रकाश असावा परंतु प्रखर ऊन नसावे.
- ✓ फवारणी करत असताना शक्यतो किटकनाशक व बुरशीनाशकासोबत स्टिकर घ्यावे. सध्या नवीन उपलब्ध होणाऱ्या किडनाशकामध्ये स्टिकर पूर्वीच मिसळलेले असते याबाबत माहिती घेऊन स्टिकर चा वापर करावा.
- ✓ फवारणी करत असताना विविध संजीविके, रासायनिक खते एकमेकात मिसळवायची टाळा.
- ✓ फवारणी करण्यापूर्वी रसायनाची सुसंगता तपासावी त्यासाठी प्रथम लिटमस टेस्ट करावी.
- ✓ किडनाशके फवारण्याचा क्रम पुढीलप्रमाणे असावा, सुरुवातीस ( WP, WG, SP, SG ) पावडर स्वरूपातील किडनाशके नंतर द्रव्य ( CS, SC, SL, EC, SE, ZC ) स्वरूप त्यानंतर स्टिकर, त्यानंतर OD फॉर्म व शेवटी पाण्यात विरघळणारी खते मिसळावीत.
- ✓ फवारणीच्या द्रावणाचा सामू न्यूट्रल किंवा ऍसिडिक असावा.
- ✓ फवारणीपूर्वी स्टॉक सोलुशन तयार करून घ्यावे नंतर ते स्टॉक सोलुशन फवारणीसाठी वापरावे.
- ✓ प्रतिबंधात्मक फवारणीसाठी आंतरप्रवाही किडकनाशके तर उपचारात्मक फवारणीसाठी स्पर्शजन्य किडनाशके वापरावीत.
- ✓ आंतरप्रवाही किडनाशके सकाळी वापरावीत तर स्पर्शजन्य किडनाशके सायंकाळी वापरावीत.
- ✓ फवारणीचे द्रावण संपूर्ण पिकावर, पानावर व खोडावर जाईल हे पाहावे.
- ✓ पिक वाढीच्या कायिक अवस्थेत पहिली किंवा दुसरी फवारणी आंतरप्रवाही किडनाशकाची घ्यावी आणी नंतरच्या अवस्थेत स्पर्शजन्य किडनाशके वापरावीत . प्रादुर्भाव जास्त असेल तर ब्रॉडस्पेक्टम किडनाशकांचा वापर करावा.
- ✓ किडनाशकाचे द्रावण केल्यानंतर ते त्याच दिवशी, ताबडतोब संपवावे / वापरावे.
- ✓ पिकावर येणारे जैविक - अजैविक ताण याबाबत शेतकऱ्यानी आपण निवडलेल्या पिकाबद्दलची संपूर्ण शास्त्रोक्त माहिती विविध अधिकृत माध्यमांकडून जसे की कृषी विद्यापीठ, कृषी संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, कृषी विभाग व ईतर शासकिय यंत्रणेकडून घ्यावी. खाजगी अनोळखी व्यक्ती / विक्रेते व समाजमाध्यमावर फार विश्वास ठेवू नये.



- ✓ किड व रोग व्यवस्थापनासाठी कोणते किडनाशक वापरता त्यापेक्षा ते कधी, कोठे, कसे आणी केंव्हा वापरता यास जास्त महत्व आहे. केवळ महागडे वापरले म्हणजे झाले असे होत नाही.
- ✓ तसेच किडनाशकाची निवड, शिफारशीतील प्रमाण, प्रतिक्षा कालावधी, फवारणीची वेळ, स्टिकर चा वापर, निवडलेला फवारणी पंप ह्या गोष्टी जास्त महत्वाच्या आहेत.
- ✓ सुरूवातीस प्रतिबंधात्मक उपाय योजना अंतर्गत वनस्पतीजन्य (लिंबोळी अर्क) नंतर जैविक किडनाशके जसे की, लेक्यानीसिलियम लेक्यानी, मेटारायझम ॲनीसोप्ली, बॅसिलस सबटिलीस, बॅसिलस थुरेनजेनेसिस व नोमुरिया रिलाईची फवारणी घ्यावी व किडीनी आर्थिक पातळी ओलांडल्यावर शिफारस असलेल्या रासायनिक किडनाशके शिफारशीतील मात्रेत घेवून सकाळी / सायंकाळी फवारावीत.
- ✓ जैविक किडनाशंकाची खरेदी ही खात्रीचे उत्पादकांकडून करावी. त्याचे दर्जाबाबत जास्त चौकस राहाण्याची गरज आहे. ही जैविक बुरशीनाशके / किडनाशकांचे आळवणी अथवा फवारणी केल्यानंतर 10-15 दिवस किंवा वापरण्यापूर्वी 10 दिवस कोणत्याही रासायनिक किडनाशकांचा फवारणी तथा आळवणीसाठी वापरू नयेत.
- ✓ दरवेळी फवारणीसाठी वेगळ्या गटातील रसायने वापरावीत जेणेकरून किड तथा बुरशीची किडनाशकांप्रती प्रतिकारक्षमता विकसित होणार नाही.
- ✓ आपण घेत असलेल्या पिकासाठी फक्त केंद्रिय किटकनाशक मंडळ तथा नोंदणी समिती व कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेलीच किडनाशके व तिही शिफारशीतील मात्रेतच, वारा शांत असताना, जमिनीत ओल असताना, सकाळी किंवा सायंकाळी वापरावीत, जेणेकरून त्यांची परिणामकारकता चांगली राहील व विषमुक्त अन्न तयार करता येईल.

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!

**❖ ह्यु मिक ॲसिड, रासायनिक किडनाशकांच्या आळवण्या व टॉनिकचा वापर :**

येणाऱ्या हंगामात बियाणे वापरण्यासोबत उगवण चांगली व्हावी होण्यासाठी, पांढरी मूळीची वाढण्यासाठी म्हणून ह्यु मिक ॲसिड, फुलविक ऍसिड पेरणीसोबत एकरी 5-10 किलो वापर करावा, यासाठी सर्व संबंधित उत्पादक मंडळी आपल्या युट्युब वरील व्हिडिओ मधून तसेच जाहिरातीद्वारे विविध यु ट्यूब चॅनल, फेसबुक, इंस्टाग्राम वरून करतीलच. त्याचसोबत कृषि सेवा केंद्राकडून जास्त फांद्या फूटण्यासाठी, जास्त फुलकळी निघण्यासाठी, फुलगळ होऊ नये म्हणून, सेटींग होण्यासाठी, शेंगा भरण्यासाठी, म्हणून वेगवेगळ्या प्रकारची टॉनिक (PGR, PGP, PGI) विक्री बाबत आगृही असतात आणी हे करत असताना शेतकऱ्याचा उत्पादन कमी करून उत्पादन वाढविण्याचा आव मात्र ही मंडळी आणतात पण अशा फसव्या आग्रहास अजिबात बळी पडू नका.



पिकास आवश्यक असणारी सर्व प्रकारची संजीवके पिकाच्या शेंड्याकडील भागात किंवा मुळीच्या टोकाकढील भागामध्ये तयार होत असतात त्यामुळे ती बाहेरून देण्याची आवश्यकता नसते, केवळ उच्च उत्पादनाच्या आशेपोटी, अंधविश्वास ठेवून अशा प्रकारचे कुठलेही संजीवके विकत घेऊ नका आणि अनावश्यक उत्पादन खर्च वाढवू नका.

आज बाजारात सर्व काही उपलब्ध आहे पण त्याची मला खरंच गरज आहे का ?, त्यामुळे माझ्या पिकास खरंच फायदा होत आहे का ?, पॅकिंग वर लिहिलेले घटक त्याध्ये खरच असतील का ? या फंदात पडूच नका.

बाजारातून फक्त प्रमाणित बियाणे, सरळ खते, संयुक्त खते, पाण्यात विरघळणारी खते, खात्रीच्या उत्पादकाकडील जैविक किटकनाशके - बुरशीनाशके, जैविक खते, बहुराष्ट्रीय नामांकित कंपन्याची किटकनाशके व बुरशीनाशके आणि उच्च दर्जाचे स्टीकर एवढेच विकत आणायचे आहे. याव्यतिरिक्त काही विकत आणून आपला उत्पादन खर्च अनावश्यक वाढवू नका आणि तोट्याची शेती करू नका. आज अशी परिस्थिती आहे की शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या सर्व व्यावसायिकांचा उत्कर्ष होत आहे परंतु शेतकरी मात्र दिवसेंदिवस गाळात चाललेला आहे.

**मित्रांणो ! खरच या सर्वाची गरज नाही !**

कृपया कोणत्याही जाहिरातीस, आग्रहास, दिशाभूल करणाऱ्या यू ट्यूब वरिल माहितीस बळी पडू नका ह्यु मिक ॲसिड व टॉनिक अजिबात खरेदी करू नका. निवडलेले पिकास आवश्यक असलेल्या सर्व बाबी वेळेत करा म्हणजेच हिवाळ्यात नांगरट करून जमीन चांगली तापू द्या, पिकाची फेरपालट करा, SRT शेती पद्धती बाबत माहिति घ्या, विना नांगरनी, कमी मशागत शेती बाबत सविस्तर माहिती घ्या, बिजप्रक्रिया करा, पिकाची लागवड बेडवर करा, उगवणपूर्व तणनाशके वापरा, पाण्यात विरघळणारी खते फवारानी साठी वापरा, किड व रोगांची नियमित पाहणी करून सुरूवातीस स्वस्त, साधी किडनाशके व नंतर आवश्यकतेनुसार महागडी किडनाशके वापरा तर आणि तरच शेती ही फायद्याची, किफायतशीर, परवडणारी व आरोग्यदायी होणार आहे त्यासाठी **" ज्ञानाच्या शेतीची "** कास धरा.

येणाऱ्या खरिप हंगामात वेळेवर व पिकाचे गरजेनुसार पाऊस पडो व
शेतकऱ्यांना यासाठी हा हंगाम फायद्याचा होवो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**धन्यवाद !**

शेतीमध्ये वापरावयाच्या निविष्ठां खरेदी आणि वापराविषयीच्या अडचणी, तक्रारीसाठी आणि इतर माहिती तथा मार्गदर्शनासाठी कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांक 18002334000 यावर संपर्क करावा.

**खरिप हंगामासाठी मन:पूर्वक शुभेच्छा ।।।**

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!